ePaper

वर्ष - 8 । अंक - 352 | UDYAM-MH-26-0158827

## पुणे रेव्ह पार्टी प्रकरणात राजकीय षडयंत्राचा वास : अंजली दमानिया



महाईन्यूज ™

www.mahaenews.com । गुरुवार, दि. 31 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- अभिषेक शर्मा चमकला!
- बेन स्टोक्स दुखापतग्रस्त
- तिसऱ्या देशाचा हस्तक्षेप नाही!
- राष्ट्रीय हितांचं रक्षण करण्यासाठी सर्व


## 'महायुती' त 'ऑल इज नॉट वेल' : 'डॅमेज कंट्रोल' साठी नेत्यांची धावपळ !

# शिंदे दिल्लीत, गोंधळ गल्लीत!

## कलंकित मंत्र्यांचे पुढे काय ? अनेकांना ईडी, सीबीआयच्या नोटिसा : फडणवीस, शिंदे, अजितदादांची कसरत!

। मुंबई / नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**महाराष्ट्रातील सत्ताधारी 'महायुती' मध्ये मोठ्या प्रमाणावर धुसपूस सुरू आहे आणि सर्व गोष्टी काही सुरळीत नाही हे आता चव्हाट्यावर आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची 'डॅमेज कंट्रोल' साठी धावपळ सुरू आहे.**



### पार्श्वभूमी मंत्रिमंडळातील फेरबदलाची..

मंत्रिमंडळात मोठ्या प्रमाणावर फेरफार होऊन फेर बदलही होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे राज्यातील 'कलंकित' मंत्र्यांचा प्रश्न पुढे आला आहे. दुसरीकडे अनेक आमदारांना आणि मंत्र्यांना ईडी तसेच सीबीआय ने नोटिसाही पाठवल्या आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांचा दिल्ली दौरा अतिशय ऐरणीवर आला असून या दौऱ्यात ते कोणाकोणाच्या गाठीभेटी घेतात आणि चर्चा करतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

### अचानक दिल्ली दौऱ्याचे गौडबंगाल काय?

एकनाथ शिंदे बुधवारी दुपारी सर्व नियोजित कार्यक्रम टाकून पुन्हा एकदा अचानक दिल्लीला रवाना झाले आणि संपूर्ण राजकीय वर्तुळात चर्चांना चांगलाच ऊत आला. गेल्यावेळीही पावसाळी अधिवेशनादरम्यान रात्रीच्या अंधारात दिल्ली गाठलेल्या शिंदेंच्या दौऱ्याने खळबळ माजवली होती. यावेळीही त्यांच्या दिल्ली दौऱ्याची मंत्रिमंडळात कुणालाही पूर्वकल्पना नसल्याने राजकीय तर्कवितर्कांना पुन्हा एकदा खाद्य मिळाले आहे. 'डॅमेज कंट्रोल' हे त्या मागील कारण असल्याचे बोलले जात आहे.

### शिवसेनेच्या खासदारांची बैठक

दिल्लीतील संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना शिंदे आपल्या खासदारांसोबत बैठक घेणार असल्याचे बोलले जात आहे. महाराष्ट्रातील अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी ते आपल्या खासदारांना मार्गदर्शन करतील तसेच सूचना देतील असे सांगण्यात येते.

### ऑल इज नॉट वेल..'

'महायुती' सरकार आलबेल असल्याचे भासवले जात असले, तरी मंत्रीपदांवरून चाललेले वाद, व्हीडिओ गळती, मारहाणीच्या घटना आणि जादूटोण्याचे आरोप यामुळे सरकारची प्रतिमा डागाळली आहे. विशेषतः एकनाथ शिंदे यांचे आमदार आणि मंत्री जास्त अडचणीत आहेत. त्यामध्ये संजय शिरसाट, भरत गोगावले, योगेश कदम, संजय गायकवाड, संदीपान भुमरे यांना कसे वाचवायचे हा मोठा प्रश्न आहे आणि त्याच्यासाठी एकनाथ शिंदे दिल्लीत पोहोचले असल्याचे सांगण्यात येते.

### पडद्यामागे वेगवान घडामोडी..

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पडद्यामागे वेगाने घडामोडी सुरू आहेत. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आहेत. दुसरीकडे, विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीनमध्ये एका कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचा वाद चांगलाच गाजला होता. तसेच, शिवसेना मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हीडिओ समोर आला होता, ज्यात त्यांच्या बाजूला पैशांनी भरलेली बॅग दिसली होती. यावरूनही गदारोळ झाला. याशिवाय, मंत्री भरत गोगावले यांच्या एका फोटोवरून त्यांच्यावर जादूटोण्याचा आरोपही करण्यात आला होता.

### सर्व घटना अगदी ताज्या...

हे सर्व प्रकार अगदी ताजे असताना या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळातील वादग्रस्त मंत्र्यांना सरकार बाहेरचा रस्ता दाखवणार असल्याची चर्चा होती, परंतु अद्याप तसे काही झालेले नाही, काहींना समज देण्यात आली आहे.

### भाजपाच्या आमदारांचा रोष..

दुसरीकडे भाजपाच्या आमदारांनी थेट एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्याची देवेंद्र फडणवीसांकडे तक्रार केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या खात्यातील निधीच्या मंजुरीवर अंतिम स्वाक्षरीची जबाबदारी स्वतःकडे घेतली आहे.

### शिंदे म्हणजे कार्यक्षम, लोकप्रिय नेते

एकनाथ शिंदे हे जनतेत सहज मिसळणारे, कार्यक्षम आणि लोकप्रिय नेते मानले जातात. पण, त्यांच्याच मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप, निधी वाटपातील भेदभाव आणि वादग्रस्त निर्णय यामुळे शिंदेंच्या नेतृत्वावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यांच्या दिल्ली दौऱ्यामागे फक्त अधिवेशनाचे निमित्त आहे की 'डॅमेज कंट्रोल'चा खाक्या हे लवकरच स्पष्ट होईल.

### वारंवार दिल्ली दौरा कशासाठी?

एकनाथ शिंदे यांचा वारंवार दिंडी दौरा कशासाठी असतो, असा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे. फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात सर्वात जास्त 'कलंकित' मंत्री हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आहेत. अनेक मंत्र्यांना आणि आमदारांना या आठवड्यात ईडी तसेच सीबीआय ने नोटिसा बजावल्या आहेत. फडणवीस यांचा मंत्रिमंडळ विस्तार आणि फेरबदल अगदी लवकरच होणार असून गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन 'डॅमेज कंट्रोल' करण्यासाठी शिंदे दिल्लीत पोहोचले आहेत, अशी दबक्या आवाजात चर्चा आहे. एकनाथ शिंदे यांच्या खासदारांना संसदरत्न पुरस्कार मिळाला असून सर्व खासदारांची ही बैठक ते घेणार आहेत, त्याचबरोबर 'ऑपरेशन सिंदूर ' प्रश्नावर नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेबद्दलही त्यांना भेटून अभिनंदन करणार आहेत, असे सांगण्यात येते.

# महापालिकेची शोध मोहीम सुरू!

## महापालिकेची पाणी मीटर बसवून नळजोड नियमित

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेला अल्प प्रतिसाद मिळाल्यानंतर महापालिकेने ठेकेदारामार्फत नळजोड शोध मोहीम हाती घेतली आहे. आतापर्यंत २० हजार अनधिकृत नळजोड आढळून आले असून, त्यांपैकी एक हजार ३४७ नळजोड नियमित करून पाणी मीटर बसविण्यात आले. शहरात ३० हजारांहून अधिक नळजोड अनधिकृत असल्याचा प्रशासनाचा अंदाज आहे. या कामासाठी ३२ कोटी रूपयांचा खर्च करण्यात येत आहे.**

पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख ३५ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. तर, दोन लाख अधिकृत नळजोड धारकांची संख्या आहे. गृहनिर्माण संस्थांचे एकत्रित नळजोड आणि अनधिकृत नळजोडांमुळे मालमत्तांच्या तुलनेत नळजोडांची संख्या कमी दिसत असल्याचा प्रशासनाचा दावा आहे. ४० टक्के पाण्याची गळती, चोरी होत असून पाणीपट्टीतून अपेक्षित उत्पन्नही मिळत नव्हते. ही गळती, चोरी रोखण्यासाठी आणि उत्पन्न वाढीसाठी महापालिकेने अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी २०२३ मध्ये विशेष मोहीम राबविली. तीन वेळा मोहिमेला मुदतवाढ दिली. अनामत रक्कमही घेतली नाही. तरीही, नळजोड अधिकृत करण्यास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला नाही. महापालिकेच्या आठ प्रभागांतून केवळ एक हजार ६७३ जणांनी नळजोड



नियमित करण्यासाठी अर्ज केले. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने नळजोड नियमित करण्याचे काम ठेकेदारामार्फत करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अनधिकृत नळजोड सर्वेक्षण आणि मीटर बसविण्याचे ३२ कोटींचे काम चार डिसेंबर २०२४ पासून सुरु केले. कामाची मुदत २४ महिन्यांची असून मागील सात महिन्यांपासून सर्वेक्षण सुरू आहे. आतापर्यंत झालेल्या सर्वेक्षणात झोपडपट्टीसह विविध भागात २० हजार अनधिकृत नळजोड आढळून आले. त्यांपैकी एक हजार ३४७ नळजोड अधिकृत करून मीटर बसविण्यात आले आहेत. त्यांना पाणी पट्टीची आकारणी सुरू केली. उर्वरित अनधिकृत नळजोडांची पडताळणी करण्यात येत आहेत. अनधिकृत नळजोड अधिकृत करून ठेकेदारांमार्फत पाणी मीटर बसविण्यात येत आहेत. निवासी आणि बिगर निवासी इमारतीसाठी नळजोडच्या व्यासाप्रमाणे एक मीटर बसविण्यासाठी दहा हजारांपासून पुढे खर्च येत आहे. हा खर्च नळजोड धारकांकडून पाणीपट्टीच्या दरमहा

### मीटरची रक्कम देयकांमधून वसूल

४० टक्के पाण्याची गळती, चोरी होत असून पाणीपट्टीतून अपेक्षित उत्पन्नही मिळत नव्हते. ही गळती, चोरी रोखण्यासाठी आणि उत्पन्न वाढीसाठी महापालिकेने अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी २०२३ मध्ये विशेष मोहीम राबविली. तीन वेळा मोहिमेला मुदतवाढ दिली.अनामत रक्कमही घेतली नाही. तरीही, नळजोड अधिकृत करण्यास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला नाही. महापालिकेच्या आठ प्रभागांतून केवळ एक हजार ६७३ जणांनी नळजोड नियमित करण्यासाठी अर्ज केले. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने नळजोड नियमित करण्याचे काम ठेकेदारामार्फत करण्याचा निर्णय घेतला.

देयकातून ६० हप्त्यामध्ये वसूल करण्यात येणार आहे.शहराला मावळातील पवना धरणातून ५२०, आंद्रा धरणातून ९० तर एमआयडीसीकडून २० असे ६३० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी दिवसाला दिले जाते. यांपैकी ४० टक्के पाण्याची गळती, चोरी होत असल्याचा प्रशासनाचा दावा आहे. अधिकृत नळजोड, मीटर बसविल्यानंतर शहरातील पाणी गळती, चोरी कमी होईल. महापालिकेच्या उत्पन्नातही वाढ होईल, असा दावा पाणी पुरवठा विभागाने केला.पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख ३५ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. तर, दोन लाख अधिकृत नळजोड धारकांची संख्या आहे. गृहनिर्माण संस्थांचे एकत्रित नळजोड आणि अनधिकृत नळजोडांमुळे मालमत्तांच्या तुलनेत नळजोडांची संख्या कमी दिसत असल्याचा प्रशासनाचा दावा आहे.

# नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेचे प्रारूप तयार

## हरकती नोंदविण्याची 21 ऑगस्टपर्यंत मुदत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्ह्यातील चौदा नगरपरिषदा आणि तीन नगरपंचायतींच्या प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा करण्यात आला आहे. नगरपरिषदांचा आराखडा नगरविकास विभागाकडे तर, नगरपंचायतींचा आराखडा विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. या दोन्हींवर येत्या २१ ऑगस्टपर्यंत हरकती-सूचना नोंदविता येतील.**

दरम्यान, आराखड्यानुसार जिल्ह्यातील बारामती आणि फुरसुंगी या दोन नगरपरिषदांमध्ये




अनुक्रमे ४१ आणि ३२ इतकी सर्वाधिक सदस्यसंख्या असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषद, पंचायत समित्यांसह नगरपंचायत आणि नगरपरिषदांच्या प्रभाग रचनेच्या प्रारूप आराखडा तयार करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार पुणे जिल्ह्यातील १४ नगरपरिषदा आणि तीन नगरपंचायतींनी प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार करण्यात आला आहे.आराखडा पूर्ण झाल्यानंतर तो जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आला होता. जिल्हा प्रशासनाकडून त्याची छाननी करण्यात आली. त्यानंतर मंचर, माळेगाव आणि वडगाव मावळ या तीन नगरपंचायतींचा प्रारूप आराखडा हा विभागीय आयुक्तालयात पाठविण्यात आला आहे.

तर बारामती, तळेगाव, लोणावळा, चाकण, दौंड, फुरसुंगी, सासवड, जेजुरी, भोर, इंदापूर, जुन्नर, आळंदी, शिरूर आणि राजगुरूनगर या चौदा नगरपरिषदांचा प्रारूप आराखडा मान्यतेसाठी नगरविकास विभागाचे प्रधान सचिवांकडे पाठविण्यात आल्याची

### नगरपंचायतीमध्ये एकचा प्रभाग

तर फुरसुंगी नगरपरिषदेची प्रथमच निवडणूक होणार असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.जिल्ह्यात नगरपंचायतीमध्ये एक सदस्य प्रभाग पद्धत आहे. तर चौदा पैकी बहुतांश नगरपरिषदांमध्ये द्विसदस्य प्रभाग पद्धती आहे. जिल्ह्यात बारामतीत ४१, लोणावळा २७, चाकणमध्ये २५, आळंदी, राजगुरुनगरमध्ये प्रत्येकी २१ सदस्य संख्या आहेत.

माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या प्रारूप आराखड्याबाबत १८ ते २१ ऑगस्ट दरम्यान हरकती सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्यानंतर २२ ऑगस्ट ते एक सप्टेंबर दरम्यान नगरपरिषदांच्या हरकतींवर सुनावणी घेण्यात येईल. तसेच नगरपंचायतीच्या हरकतीवर २२ ऑगस्ट ते आठ सप्टेंबर दरम्यान सुनावणी होईल. त्यानंतर २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनेचा अंतिम आराखडा प्रसिद्ध करण्यात येईल, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. नगर विकास विभागाने मान्यता दिल्यानंतर तो त्यांच्यामार्फत निवडणूक आयोगाकडे पाठविला जाईल. नगरपरिषदांसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार आयोगाकडून पुन्हा हा आराखडा विभागीय आयुक्तांकडे पाठविला जाईल. देहू नगरपंचायतीची निवडणूक होणार नाही.

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा सकारात्मक पाठपुरावा

# चाकण औद्योगिक क्षेत्राची आता वाहतूक कोंडी-समस्यामुक्तीकडे वाटचाल!

### सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची बैठक

**पिंपरी-चिंचवड । पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**गेल्या अनेक वर्षांपासून चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी आणि पायाभूत सोयी-सुविधांबाबतच्या समस्यांवर ठोस उपायोजना झाल्या नाहीत. परिणामी, चाकरमानी, वाहनचालक आणि औद्योगिक कंपन्या त्रस्त झाल्या होत्या. मात्र, आता औद्योगिक क्षेत्र समस्यामुक्तीच्या दिशेने वाटचाल करील, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.**



चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी आणि विविध समस्यांबाबत औद्योगिक संस्था संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनी #UNCLOG_Chakan_MIDC मोहीम हाती घेतली. तसेच, काही दिवसांपूर्वी आमदार महेश लांडगे यांची भेट घेतली आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी केली होती.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मुंबई येथील दालनामध्ये चाकण औद्योगिक क्षेत्र वाहतूक कोंडी आणि समस्यामुक्त करण्याबाबत महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या मावळ, खेड परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य अभियंता, एमएसआयडीसी, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे, मुख्य अभियंता, एमआयडीसी, पुणे, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे, पोलीस उपायुक्त (वाहतूक), पिंपरी-चिंचवड, मुख्य अधिकारी, चाकण/तळेगांव नगरपालिका असे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

चाकण हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील एक अत्यंत महत्त्वाचे औद्योगिक केंद्र असून, सध्या येथे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

या समस्या औद्योगिक क्षेत्रापुरत्याच मर्यादित नसून, स्थानिक रहिवाशांच्या जीवनमानावरही प्रतिकूल परिणाम घडवत आहेत, अशी भूमिका मा. मंत्रीमहोदय यांच्यासमोर आमदार लांडगे यांनी मांडली.

> ‘हिंजवडी आयटी पार्क’ वाहतूक कोंडी आणि समस्यामुक्त करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली भाजपा महायुती सरकारच्या माध्यमातून ‘सिंगल पॉईट ॲथॉरिटी’ निश्चित केली आणि कामाला सुरूवात झाली. त्याचप्रमाणे आता चाकण औद्योगिक क्षेत्र सममस्यामुक्त करण्यासाठी आम्ही सकारात्मक भूमिकेतून पाठपुरावा करीत आहोत. आज सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासोबत बैठक झाली. लवकरच मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थित आढावा बैठक घेण्यासाठी प्रयत्नशील आहोत. UNCLOG_Chakan_MIDC आम्ही सक्रीय आणि सकारात्मक पाठपुरावा करीत आहोत.
> **- महेश लांडगे, आमदार,** भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### हिंजवडीप्रमाणे ‘सिंगल पॉईंट ॲथॉरिटी’ करा...

राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (नाशिक फाटा ते खेड) एलिव्हेटेड कॉरिडॉर भूसंपादन (पिंपरी-चिंचवड महानगरपालिका पीएमआरडी, एमआयडीसी, नॅशनल हायवे, पीडब्ल्यूडी किंवा जिल्हा परिषद अशा सर्व अस्थापनांशी समन्वय करण्यासाठी ‘सिंगल पॉईंट ॲथॉरिटी’) पिंपरी-चिंचवडमधून चाकण औद्योगिक पट्ट्यात प्रवेश करणाऱ्या रस्त्यांचा विस्तार आणि राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ (हडपसर ते यवत) आणि राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी (तळेगाव–चाकण–शिक्रापूर) काम सुरू करणे. यासह रस्त्यांचे विस्तारीकरण व देखभाल, वाहतूक नियंत्रण व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक सुधारणा, पार्किंग व्यवस्थापन, औद्योगिक वाहतुकीसाठी स्वतंत्र मार्ग (फ्रेट कॉरिडॉर), स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, नगरपालिका), MSRDC, PWD, RTO आणि पोलीस विभाग यांच्यात समन्वय करुन दीर्घकालीन वाहतूक मास्टर प्लॅन तयार करून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याची मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे. त्याला मंत्री महोदय यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

---

## दिव्यांग बांधवांसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स उपयुक्त ठरेल!

### आयुक्त शेखर सिंह : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनमध्ये झाली सेंटरची सुरवात

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनमध्ये सुरू करण्यात आलेले सेंटर ऑफ एक्सलन्स केंद्र दिव्यांग बांधवांमधील कौशल्यांचे विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. दिव्यांग व्यक्तीमधील कौशल्य शोधून त्यानुसार त्याला योग्य काम मिळवून देण्यासाठी या केंद्राची भूमिका महत्त्वाची असणार आहे,’ असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.**







पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशन येथे इनबेल इंडिया आणि रोहिणी संस्था यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे उद्घाटन आयुक्त सिंह यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, महापालिकेच्या उपायुक्त ममता शिंदे, सहाय्यक आयुक्त निवेदीता घार्गे, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, इनबेल इंडिया संस्थेच्या शांती राघवन, रोहिणी संस्थेचे अक्षय सरोदे यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, खासगी कंपनीचे प्रतिनिधी, दिव्यांग बांधव उपस्थित होते. आयुक्त सिंह म्हणाले, ‘दिव्यांग बांधवांसाठी वर्क प्लेस सोल्युशन शोधण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम महापालिकेच्या माध्यमातून राबवण्यात येत आहेत. दिव्यांगांना औद्योगिक क्षेत्रामध्ये काम मिळावे, यासाठी लवकरच एका कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. इनबेल इंडिया व रोहिणी संस्थेच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेले सेंटर ऑफ एक्सलन्समुळे आता दिव्यांग व्यक्तीमधील कौशल्य ओळखून, त्याचे विश्लेषण करून त्यानुसार त्यांना नोकरी देणे शक्य होणार आहे. दिव्यांग व्यक्तीला येणाऱ्या दैनंदिन अडचणींवर कशा प्रकारे ते मात करू शकता, याबाबतही माहिती या केंद्रातून मिळू शकरणार आहे. दिव्यांग व्यक्ती विविध क्षेत्रात कशा प्रकारे काम करू शकतात, याची माहितीही येथे मिळणार आहे. त्यामुळे हे केंद्र खऱ्या अर्थाने दिव्यांगांना सक्षम करण्यास उपयुक्त ठरणार आहे.’, व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख यांनी दिव्यांग भवनच्या कामाबाबत माहिती सांगताच दिव्यांग बांधवांचे सर्वेक्षण किती महत्त्वाचे आहे, याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, ‘दिव्यांगांच्या सर्वेक्षणातून जी माहिती संकलित होईल, त्याचे विश्लेषण करून कामाची गती वाढवता येईल.

### आयुक्तांनी घेतली सेंटर ऑफ एक्सलन्सची माहिती

सेंटर ऑफ एक्सलन्सचे उदघाटन केल्यानंतर त्याबाबत सविस्तर माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी इनबेल इंडियाच्या शांती राघवन व रोहिणी संस्थेचे अक्षय सरोदे यांच्याकडून घेतली. दिव्यांग व्यक्तीला येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी हे सेंटर कसे उपयोगी पडू शकते, याबाबत सविस्तर माहिती शांती राघवन यांनी दिली. तर, दिव्यांग बांधवांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी या सेंटरचा कसा उपयोग होऊ शकतो, याबाबत माहिती अक्षय सरोदे यांनी दिली.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



### राम कर्ता हे जाणून चित्तीं । जगांत संत ऐसें वर्तती॥

जेथें मीपणाचें ठाणें । तेथें दु:खाचें साम्राज्य असणें । हा आहे नियम । म्हणून मी सांगतों राखावा नेम ॥ सर्वस्वीं व्हावें भगवंताचें। ‘ मी, माझें ’ सोडून साचें ॥ बाह्य मीपणानें जरी सोडलें । पण अभिमानानें वृत्ति बळावली । तेथें घाताला सुरुवात झाली ॥

बुद्धि करावी स्थिर । नामीं असावें प्रेम अनावर । राम कर्ता हें जाणून चित्तीं । जगांत संत ऐसें वर्तती ॥ साधनीं सावधान जाण । हेंच साधकाचें मुख्य लक्षण॥ बाह्य वेषानें कसाहि नटला । जगाला भुलविता झाला । तरी जोंवरी नाहीं चित्त स्थिर । कसा पावेल रघुवीर?॥

आजवर केल्या गोष्टी फार । भल्या बुऱ्या असतील जाण । त्याचा न करावा विचार । पुढें असावें खबरदार ॥ मानावी परस्त्री मातेसमान । दुसऱ्याचें न पाहावें उणेंपण । परनिंदा टाळावी । स्वत:कडे दृष्टि वळवावी ॥ गुणांचें करावें संवर्धन । दोषांचें करावें उच्चाटन । याला एकच उपाय जाण । अखंड असावें अनुसंधान ॥

प्रपंच न मानावा सुखाचा । तो असावा कर्तव्याचा ॥ वृत्ति असावी स्थिर । चित्तीं भजावा रघुवीर ॥ असा करा कांहीं नेम । जेणें जवळ येईल राम ॥ प्रपंचाची धरितां कांस । दु:खचि पावे खास ॥ प्रपंच हाच आधार । प्रपंचाविण निराधार । ऐशी होई ज्याची वृत्ति । समाधान न ये त्याचे हातीं । तुम्ही सुज्ञ भाविक जाण। एवढें ऐकावें माझें वचन ॥

दुष्ट मतीची उत्पत्ति । ही दुर्जनाची संगति । भावें धरितां रघुपति । सर्व संकटें दूर जाती ॥ वृत्ति असावी खंबीर । ज्याचा आधार रघुवीर ॥ दुर्जनांचें जैसें मन । पाषाणास न फुटे द्रव जाण । तैसें प्रपंचीं इच्छी जो सुख । जें आजवर कोणास न मिळाले देख ॥ प्रपंचाचें दु:ख जाण । तें मीपण असल्याची खूण जाण ॥

जगांत वर्तावें, घरांत असावें । व्यवहारांत व प्रपंचांत वागावें । परि न कोठें गुंतावें ॥ फार दिवसांचा वृक्ष झाला । घरांतील घडामोडी दिसती त्याला । जैसें तो न सोडी आपलें स्थान । तैसें वागावे आतां आपण ॥

ज्याचे घरीं रामाचा वास । तेणें न राहावें कधीं उदास ॥ सदा राखावें समाधान । मुखीं भगवंताचें नाम ॥ आतां प्रेम ठेवा नामीं । कृपा करील चक्रपाणी ॥ आतां करा चित्त स्थिर । हृदयीं धरा रघुवीर ॥ रामावांचून न आणावा विचार । हाच माझा आशीर्वाद ॥

बोधवचन:- जेथे नाम तेथे राम। हा ठेवावा विश्वास। कृपा करील रघुनाथ खास॥

# म्हणे, विरोधकांकडून पोलखोल, सत्ताधारी वाजवतात विजयी ढोल!



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**संसदेचे पावसाळी अधिवेशन हळूहळू आखाडा बनत चालले आहे. नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह यांच्यासारखे बुजुर्ग ऐन जोमात आहेत. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, सुप्रिया सुळे, कनीमोळी यांचे ‘ऑपरेशन सिंदूर’ बाबतचे बाऊन्सर्स सत्ताधारी बाकांकडून व्यवस्थित परतवले जात आहेत. अधिवेशनाचा पहिला आठवडा कामकाज न होताच संपला. काम झाले नाही. मात्र, राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी राजीनामा देत खळबळ उडवून दिली. दरम्यान, सोमवारपासून ‘ऑपरेशन सिंदूर’ वर दोन दिवस चर्चा करण्याचे जाहीर झाले. सहाजिकच राजीनाम्याचा विषय काहीसा मागे पडला आणि सोमवार पासून ‘ सिंदूर’ वर चर्चा सुरु झाली .**

### धनखड यांचा राजीनामा..

खरेतर धनखड यांच्या राजीनाम्याबाबत चर्चा होणे गरजेचे होते. तथापि, पहेलगाम हल्ल्याचा मुद्दा हा कामकाजामध्ये महत्त्वाचा ठरल्याने किंबहुना तो महत्त्वाचा असल्याने त्यावर चर्चा प्राधान्याने घेतली गेली. धनखड यांचा तडकाफडकी राजीनामा तसाच गुलदस्त्यात राहिला, किंबहुना त्याला बासनात गुंडाळण्याची सरकारची असलेली इच्छा पूर्ण झाली.

### ऑपरेशन सिंदूर..

पहलगाम हल्ल्याबाबतची सविस्तर माहिती जनतेपर्यंत पोहचणे गरजेचे होते. मात्र, हे करत असताना राजकीय आरोप, प्रत्यारोप कोणी करणे गरजेचे नव्हते. मात्र, उद्देश हेत्वारोपाचा असल्याने ते होणारच होते. या विषयावर सगळ्यांनाच सभागृहात बोलायचे होते. बरेचजण बोललेही. मात्र, तेच ते विषय, मुद्दे बऱ्याचदा ऐकायला मिळाले. सगळे बोलणार आणि त्याला भाजपाचे नेते उत्तर देणार हे सभागृहाचे कामकाज असल्याने तोचतो पणा येत राहिला. विरोधकांत चार ते पाच जणांनी विषय व्यवस्थित मांडला असता तर पुनरुक्ती टाळता आली असती. बहुतेकांनी पहलगाम हल्ल्याची जबाबदरी कोणाची ? असे विचारत ती पंतप्रधान मोदी यांची आहे, असे दाखवण्याचा प्रयत्न केला.

### राजीनामा मागायला हवा होता..



आता, विरोधकांनी हा विषय थेट मांडला पाहिजे होता. मोदी यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन मग बोलावे, अशी मागणी लावून धरायला पाहिजे होती. मात्र, तसे झाले नाही. एक तर असा राजीनामा मागण्याचे धाडस त्या खासदारांच्या ठायी नसावे किंवा काही तरी तडजोड झाली असावी. तडजोड होण्याची शक्यता नाही. मात्र, विरोधकांमध्ये पक्षनेता सोडून मोदींना राजीनामा मागण्याचे धाडस (?) नाही हे नक्की ! किंबहुना, सगळ्या विरोधकांना विविध देशांच्या दौऱ्यावर पाठवून, आपल्या देशाची, पाकिस्तान आणि दहशतवाद्यांबद्दलची भूमिका स्पष्ट करण्याचे पाऊल पंतप्रधान मोदी यांनी उचलले होते. त्याला विरोधकांनी ही साथ दिली. असे असताना आता संसदेत ‘सिंदूर’ वरून सरकारच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यात काय हशील ? आम्ही सरकार बरोबर आहे, हे सांगण्याचे कारण काय?

### प्रणिती शिंदे यांचा पोरकटपणा..

काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांनी जे विधान केले, त्यात ‘तमाशा’ या शब्दाचा वापर केला. तो पाहता सुप्रिया सुळे यांनी तेजस्वी सूर्या यांना दूषणे देताना प्रणिती शिंदे यांनाही त्यातली थोडी द्यायला पाहिजे होती. मात्र, आपली ती छकुली असते, हे लक्षात घ्यायला हवे. प्रणिती शिंदे यांना अजून खूप मोठी मजल मारायची आहे पण ऑपरेशन सिंदूर म्हणजे तमाशा असे पोरकट विधान करून त्यांनी पायावर धोंडा पाडून घेतला आहे. या एका विधानापोटी त्यांचे राजकीय करियर सुरू होण्यापूर्वीच संपण्याची शक्यता जास्त वाटते.

### दहशतवाद पोसणारा देश..

संसदेत संरक्षण मंत्री, गृह मंत्री, परराष्ट्र मंत्री यांनी वस्तुस्थिती मांडली. अनेक अहवालांचे दाखले दिले. पाकिस्तान हा दहशतवाद पोसणारा देश आहे , हे वारंवार सांगितले. अगदी ऑपरेशन महादेव मध्ये मारलेल्या दहशतवादी मंडळींनी खाल्लेली चॉकलेट पाकिस्तानातली आहेत हे पण सिद्ध केले. परंतु, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पाकिस्तानच्या माहितीवर विश्वास ठेवणाऱ्या विरोधकांना हे आजही मान्य नाही. पी. चिदंम्बरम यांच्यासारख्या माजी गृह मंत्र्याने सिंदूर संदर्भात जो आणि ज्या प्रकारे अविश्वास दाखवला, तो तर मोठा बालिशपणा आहे. देशावर हल्ला करणारे नक्की कोण आहेत, हे पुराव्यासह दाखवण्याची मागणी करतांना एक बाजूने जे दहशदवादी पकडले, मारले ते देखील भाजपचे नाट्य आहे, बनाव आहे, असा त्यांच्या बोलण्याचा मतितार्थ आहे,रोख आहे.

### केंद्राची चूक झालीच...

पहलगाम प्रकरणात केंद्र सरकारची चूक आहे, ती पहेलगाम येथे हल्ला होईपर्यंत त्यांना दहशदवाद्यांची खबर न लागणे ही होय. तातडीने त्यांना पकडण्यात आलेले अपयश होय. ते सरकारने मान्य केलेच पाहिजे. आपल्या अपयशावर पंडित नेहरू यांच्या चुकांचा दाखल देण्यात फारसा अर्थ नाही. तर विरोधकांनी आजचे बोला, इतिहास उगाळू नका, हे म्हणणे ही चुकीचे आहे .

### नेहरूंची चूक मान्य करा..

पंडित नेहरूंनी जी कृती त्यांच्या काळात केली ती चूक होतीच, हे पण मान्य केलेच पाहिजे. त्यांच्या चुकीच्या पावलांचे आणि निर्णयाचे परिणाम आज आपण भोगतोय, हे मान्य न करण्याचा हेकटपणा गांधी कुटुंबातील सदस्यांनी करू नये. चीनच्या बाबतीत केल्या त्या चुका होत्याच किंवा जिंकलेला पाकिस्तानचा प्रदेश काँग्रेसनेच परत दिला, हा लष्कराप्रती विश्वासघात होता, हेही कबूल केलेच पाहिजे. प्रतिमा उंचावण्याचा नादात किंवा पक्षाला बांधून ठेवण्याच्या आकांक्षेपोटी जे काही होते, तेच योग्य, हे दाखवण्याचा अट्टाहास कोणताही पक्ष करत असेल, तर ते चुकीचे आहे. आणि त्यापुढे जाऊन ‘सिंदूर’ सारख्या घटनांना नंतर त्यावर अविश्वास दाखवत जी चर्चा केली जाते, उणीदुणी काढली जातात, ती तर त्याहून चुकीची आहेत, हे फार गंभीर आहे.

### विरोधकांना समजूनच घ्यायचे नाही..

संसदेत जे बोलले जाते, त्याकडे जगाचे लक्ष असते. त्याचा परिणाम अंतरराष्ट्रीय राजकारणावर होत असतो. विरोधकांना जागतिक व्यासपीठावर आपल्या देशाविरूद्ध कोलीत मिळते. किमान विरोधी पक्षनेत्याला तरी याचे विवेकी भान असले पाहिजे. विवेकाचे भान सुटलेल्या मंडळींना विवेकाचे भान यावे हीच प्रार्थना. अन्यथा, चूक इथली संपत नाही, असे म्हणण्याची वेळ येते. महाराष्ट्रात असो किंवा केंद्रात, तेथील सरकारे काहीही कामे करत नाहीत आणि ही करतात ती योग्य नाहीत, अशीच भूमिका घेऊन दोन्ही ठिकाणी विरोधकांचा आकांडतांडव सुरू आहे. सरकारने कोणतेही पाऊल उचलले, तरी त्याला विरोध करणे एवढेच कोलीत विरोधकांनी हातात घेतले आहे. चांगल्या कामाला चांगले म्हणण्याची विरोधकांची हिंमत नाही, त्यामुळे प्रत्येक ठिकाणी आक्षेप घेणे, आरोप करणे आणि टवाळकी करणे एवढीच त्यांनी भूमिका स्वीकारली आहे आणि ती योग्य तऱ्हेने पार पाडत आहेत.. जनता त्यांना हसत आहे, हे मात्र नक्की!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा आज निकाल

## साध्वी ठाकूर, ले. कर्नल पुरोहितसह सातजणांचे भवितव्य ठरणार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मालेगाव येथे २९ सप्टेंबर २००८ रोजी झालेल्या बॉम्बस्फोटांशी संबंधित खटल्याचा राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) कायद्यांतर्गत स्थापन विशेष न्यायालय गुरुवारी निकाल देणार आहे. त्यामुळे, देशातील दहशतवादाशी संबंधित दीर्घकाळ चाललेल्या खटल्यांपैकी एक असलेल्या या खटल्यातून भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, ले. कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सात आरोपींची सुटका होणार की त्यांना दोषी ठरवले जाणार, हे ठरणार आहे.**



मालेगाव येथील मशिदीजवळ २९ सप्टेंबर २००८ रोजी मोटारसायकलमध्ये ठेवण्यात आलेल्या बॉम्बचा स्फोट होऊन सहा जण ठार आणि १०० हून अधिक जखमी झाले होते. सुरुवातीला राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) या प्रकरणाचा तपास केला होता. त्यानंतर, प्रकरणाचा तपास सीबीआयकडे, नंतर एनआयएकडे वर्ग केला गेला.प्रदीर्घ काळानंतर ऑक्टोबर २०१८ मध्ये विशेष 'एनआयए' न्यायालयाने आरोपींवर दहशतवादाच्या आरोपांतर्गत आरोपनिश्चिती केली आणि खटल्याच्या नियमित सुनावणीला अखेर सुरुवात झाली.सात वर्षांच्या सुनावणीनंतर १९ एप्रिल २०२५ रोजी फिर्यादी आणि आरोपींचा युक्तिवाद पूर्ण झाल्याचे जाहीर करून विशेष न्यायालयाचे न्यायाधीश लाहोटी यांनी खटल्याचा निर्णय राखून ठेवला होता.

लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित आणि भाजपच्या भोपाळ येथील माजी खासदार प्रज्ञासिंह ठाकूर यांच्यासह मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त), अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांच्यावर विशेष न्यायालयाने बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायदा, भारतीय दंड विधान आणि शस्त्रास्त्र कायदा अशा महत्त्वाच्या कायद्यांतर्गत दहशतवादाच्या आरोपाप्रकरणी खटला चालवला. खटल्यात 'एनआयए'तर्फे ३२३ साक्षीदारांचे साक्षीपुरावे नोंदवण्यात आले. त्यापैकी ३४ साक्षीदार फितूर झाले.आरोपींविरोधात यूएपीए कलम १६ (दहशतवादी कृत्य करणे) आणि १८ (दहशतवादी कृत्याचा कट रचणे), १२० (ब) (गुन्हेगारी कट), ३०२ (खून), ३०७ (खून करण्याचा प्रयत्न), ३२४ (स्वेच्छेने दुखापत करणे) आणि १५३ (अ) (दोन धार्मिक गटांमध्ये शत्रुत्व वाढवणे) आदी भादंविच्या विविध कलमांचा समावेश आहे. प्रकरणाच्या तपासाची सूत्रे घेतल्यानंतर एनआयएने २०१६ मध्ये पुरवणी आरोपपत्र दाखल केले होते. त्यात, साध्वी यांच्यासह श्याम साहू, प्रवीण टाकळकी आणि शिवनारायण कलसंग्रा यांच्याविरोधात पुरावे नसल्याचा दावा करून त्यांना दोषमुक्त करण्याची मागणी 'एनआयए'ने केली होती.तथापि, साध्वीविरोधात खटला चालवण्यासाठी पुरेसे पुरावे असल्याचे स्पष्ट करून विशेष न्यायालयाने तिच्यावर दहशतवादाचा आरोप निश्चित केला होता.गेल्या १७ वर्षांच्या कालावधीत खटल्याचे काम पाहणारे अतिरिक्त न्यायाधीश ए. के. लाहोटी हे पाचवे न्यायाधीश आहेत. दरम्यान, अतिरिक्त न्यायाधीश लाहोटी यांची बदली करण्यात आली होती. तथापि, खटल्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. तसेच, न्यायाधीश लाहोटी यांनी खटल्याचे जवळपास संपूर्ण कामकाज पाहिले असून सर्व युक्तिवाद ऐकला आहे. त्यामुळे, खटल्याच्या या टप्प्यावर न्यायाधीश लाहोटी यांची तूर्तास बदली केली जाऊ नये. त्यांच्या नियोजित बदलीच्या निर्णयाला मुदतवाढ देण्यात यावी.

### नियमित सुनावणीला अखेर सुरुवात


विनंती बॉम्बस्फोटातील मृतांचे कुटुंबीय आणि पीडितांनी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीकडे केली होती. त्यानंतर, अतिरिक्त न्यायाधीश लाहोटी यांच्या नियोजित बदलीचा निर्णय उच्च न्यायालयाच्या महानिबंधकांनी ३१ ऑगस्टपर्यंत स्थगित केला होता. त्यानंतर, न्यायाधीश लाहोटी यांनी अंतिम युक्तिवाद ऐकल्यानंतर खटल्याचा निकाल राखून ठेवला होता.मालेगाव येथील मशिदीजवळ २९ सप्टेंबर २००८ रोजी मोटारसायकलमध्ये ठेवण्यात आलेल्या बॉम्बचा स्फोट होऊन सहा जण ठार आणि १०० हून अधिक जखमी झाले होते. सुरुवातीला राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) या प्रकरणाचा तपास केला होता. न्यायालयाने आरोपींवर दहशतवादाच्या आरोपांतर्गत आरोपनिश्चिती केली आणि खटल्याच्या नियमित सुनावणीला अखेर सुरुवात झाली.

# सोमनाथ सूर्यवंशीप्रकरणी सरकारचे अपील

## पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश कायम

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**येथील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी उच्च न्यायालयाने संबंधित पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा आदेश पोलीस अधीक्षकांना दिला होता. या निर्णयाविरोधात राज्य सरकारने दाखल केलेले अपील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून औरंगाबाद खंडपीठाचा निकाल कायम ठेवण्याचा आदेश दिला आहे.**



काही महिन्यांपूर्वी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात असलेल्या संविधान प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर परभणीत बंद पुकारण्यात आला होता. बंददरम्यान झालेल्या दगडफेकप्रकरणी पोलिसांनी काही आंदोलकांना ताब्यात घेतले होते. विधि पदवीचे शिक्षण घेत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी या तरुणासही पोलिसांनी अटक केली होती. त्याचा न्यायालयीन कोठडीमध्ये मृत्यू झाला. त्यानंतर राज्यभरात या घटनेचा निषेध व आंदोलन करून सोमनाथला न्याय देण्याची मागणी करण्यात आली.आपल्या मुलाचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीत झाला अशी भूमिका घेत सोमनाथ यांची आई विजयाबाई यांनी थेट उच्च न्यायालयाचे दार ठोठावले. सुनावणीमध्ये उच्च न्यायालयाने सोमनाथचा मृत्यू हा न्यायालयीन कोठडीत झाला असल्याचे सांगितले.

या प्रकरणात दोषी असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सोमनाथ यांच्या आईने दिलेल्या तक्रार अर्जानुसार मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तपास हा उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे द्यावा असा आदेश न्यायालयाने दिला होता. मात्र, या प्रकरणात राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने खंडपीठाचा निर्णय कायम ठेवत राज्य सरकारचे अपील फेटाळून लावले आहे. या निकालासंदर्भात ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी समाजमाध्यमावर माहिती दिली.

### उच्च न्यायालयाचे आदेश कोणते...

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात यापूर्वीच चार कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.सोमनाथ सूर्यवंशी मृत्युप्रकरणी संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदारावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश औरंगाबाद खंडपीठाने दिले होते. एफआयआर दाखल करण्यासाठी सोमनाथच्या आईने लिहिलेल्या पत्राचा आधार घेण्यास सांगण्यात आले होते. या आदेशान्वये न्यायालयाने परभणी पोलीस अधीक्षकांकडे यासंबंधी असलेली सर्व कागदपत्रे व पुरावे पोलीस उपअधीक्षक यांच्याकडे देऊन त्यांच्या माध्यमातून चौकशी करण्याचे आदेश देत याप्रकरणी आठ दिवसांत गुन्हा दाखल करण्यात यावा, असे उच्च न्यायालयाने बजावले होते. त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्यात आली होती.काही महिन्यांपूर्वी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात असलेल्या संविधान प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर परभणीत बंद पुकारण्यात आला होता.

# तिसऱ्या देशाचा हस्तक्षेप नाही!

## ‘ऑपरेशन सिंदूर’प्रकरणी परराष्ट्रमंत्र्यांचा राज्यसभेत पुनरुच्चार

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**‘ऑपरेशन सिंदूर’ सुरू असताना भारत आणि पाकिस्तानदरम्यान शस्त्रसंधी करण्यासाठी कोणत्याही तिसऱ्या देशाने हस्तक्षेप केला नाही असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी बुधवारी राज्यसभेत सांगितले. संसदेच्या वरिष्ठ सभागृहात ‘ऑपरेशन सिंदूर’वरील विशेष चर्चेच्या दुसऱ्या दिवशी, जयशंकर यांनी हस्तक्षेप करत लोकसभेत मांडलेल्या मुद्द्यांची पुनरावृत्ती केली. तसेच शस्त्रसंधी आणि व्यापार कराराचाही संबंध नव्हता असेही त्यांनी सांगितले.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यादरम्यान २२ एप्रिल ते १६ जून या कालावधीत एकदाही दूरध्वनीवरून संभाषण झाले नाही असे जयशंकर म्हणाले. यापूर्वी पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यांना काँग्रेसने उत्तर दिले नाही असा आरोप करत त्यांनी विरोधकांवर टीका केली. दहशतवादाच्या मुद्द्यावर काँग्रेसने भारत आणि पाकिस्तानला स्वत:हून जोडले असल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, आता मोदी सरकार योग्य धोरण राबवत असून पाकिस्तानने केलेल्या प्रत्येक दहशतवादी हल्ल्याला चोख आणि योग्य उत्तर दिले जाईल असा इशारा परराष्ट्रमंत्र्यांनी दिला.एस. जयशंकर यांनी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते यांचा उल्लेख चीन-गुरू असा करत त्यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली. राहुल यांच्यासारखे लोक बीजिंग ऑलिम्पिक्स स्पर्धेला हजेरी लावून आणि चीनच्या राजदूतांची विशेष शिकवणी लावून चीनविषयी ज्ञान मिळवतात असा शाब्दिक हल्लाबोल त्यांनी केला. मात्र, आपण चीन-गुरूंप्रमाणे गोपनीय बैठका घेत नाही असे ते म्हणाले. चीन आणि पाकिस्तानदरम्यान १९६०पासून सहकार्य सुरू झाले, पण पूर्वीच्या सरकारांनी त्याविषयी काही केले नाही असे म्हणत त्यांनी काँग्रेसला जबाबदार ठरवले.राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ घोषणा नाही तर ते नैतिक कर्तव्य आणि जबाबदारी आहे असे मत राजदचे खासदार मनोज कुमार झा यांनी चर्चेदरम्यान व्यक्त केले. पहलगाम हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू ही संपूर्ण देशाला झालेली वेदना होती असे ते म्हणाले. मात्र, अशा राष्ट्रीय दु:खाच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेच्या आड लपून सरकारला वैध टीकेपासून स्वत:चा बचाव करता येणार नाही असे झा यांनी सुनावले.यापूर्वीच्या काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारांमध्ये पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाविरोधात कारवाई करण्यासाठी आवश्यक राजकीय इच्छाशक्ती नव्हती असा दावा राज्यसभेचे नेते आणि भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांनी केला. काँग्रेसने पाकिस्तानच्या बाबतीत नेहमी तुष्टीकरणाची भूमिका घेतली असे ते म्हणाले. पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकारने दिलेल्या प्रतिसादावर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी आपण सरकारमध्ये असताना काय करत होतो याची आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे असा सल्ला नड्डा यांनी दिला.मेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यादरम्यान २२ एप्रिल ते १६ जून या कालावधीत एकदाही दूरध्वनीवरून संभाषण झाले नाही असे जयशंकर म्हणाले.

### इच्छाशक्तीचा अभाव नड्डा


यापूर्वी पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यांना काँग्रेसने उत्तर दिले नाही असा आरोप करत त्यांनी विरोधकांवर टीका केली. दहशतवादाच्या मुद्द्यावर काँग्रेसने भारत आणि पाकिस्तानला स्वत:हून जोडले असल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, आता मोदी सरकार योग्य धोरण राबवत असून पाकिस्तानने केलेल्या प्रत्येक दहशतवादी हल्ल्याला चोख आणि योग्य उत्तर दिले जाईल असा इशारा परराष्ट्रमंत्र्यांनी दिला.एस. जयशंकर यांनी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते यांचा उल्लेख चीन-गुरू असा करत त्यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली. राहुल यांच्यासारखे लोक बीजिंग ऑलिम्पिक्स स्पर्धेला हजेरी लावून आणि चीनच्या राजदूतांची विशेष शिकवणी लावून चीनविषयी ज्ञान मिळवतात असा शाब्दिक हल्लाबोल त्यांनी केला.

# राष्ट्रीय हितांचं रक्षण करण्यासाठी सर्व!

## ट्रम्प यांच्या टॅरिफचा फटका बसत असल्याचं पाहायला मिळत आहे

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांचा जगाला फटका बसत असल्याचं पाहायला मिळत आहे. ट्रम्प यांनी सुरू केलेल्या टॅरिफ वॉरचे परिणाम जगातील अनेक देशांवर होत आहेत. असं असतानाच आज (३० जुलै) डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला धक्का देणारी मोठी घोषणा केली आहे. आता भारतावर अमेरिका १ ऑगस्टपासून २५ टक्के टॅरिफ लागू करणार आहे. एवढंच नाही तर रशियाबरोबर भारताने व्यवसाय केल्यामुळे दंडही वसूल करणार असल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं.**




ट्रम्प यांच्या या निर्णयाचा भारताला मोठा फटका सहन बसण्याची शक्यता आहे. दरम्यान, अमेरिकेने भारतावर २५ टक्के टॅरिफ लागू करण्याच्या निर्णयावर आता भारत सरकारची अधिकृत प्रतिक्रिया समोर आली आहे. भारत सरकारकडून एक निवेदन जारी करण्यात आलं आहे. ‘राष्ट्रीय हितांचं रक्षण करण्यासाठी भारत आवश्यक ते सर्व पावलं उचलेलं’, असं स्पष्ट करत भारताने अमेरिकेला सडेतोड उत्तर दिलं आहे.अमेरिकेने २५ टक्के टॅरिफ लादल्यानंतर भारताने प्रत्युत्तर दिलं. या संदर्भात भारत सरकारने एक प्रेस निवेदन जारी करत म्हटलं की, भारत सरकारने द्विपक्षीय व्यापाराबाबत अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या विधानाची दखल घेतली आहे. अमेरिकेच्या २५ टक्के टॅरिफच्या परिणामाबाबत सरकार अभ्यास करत आहे. सरकारने म्हटले आहे की, “भारत आणि अमेरिका गेल्या काही महिन्यांपासून निष्पक्ष, संतुलित आणि परस्पर फायदेशीर द्विपक्षीय व्यापार करारावर पोहोचण्यासाठी वाटाघाटी करत आहे. आम्ही या उद्दिष्टासाठी वचनबद्ध आहोत.”तसेच सरकार आपल्या शेतकरी, उद्योजक आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या कल्याणाचे रक्षण करण्यास सर्वोच्च महत्त्व देतं. युकेसोबतच्या व्यापक आर्थिक आणि व्यापार करारासह इतर व्यापार करारांच्या बाबतीत जे केलं गेलं आहे.

### भारताकडून दंड वसूल केला जाईल

तसं सरकार आपल्या राष्ट्रीय हितांचं रक्षण करण्यासाठी आवश्यक ते सर्व पावले उचलेल”, असं निवेदनात म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यानी बुधवारी (३० जुलै) मोठी घोषणा केली. त्यांनी म्हटलं आहे की येत्या १ ऑगस्ट २०२५ पासून भारताला २५ टक्के टॅरिफ (आयात शुल्क) भरावं लागेल. ट्रुथ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्यांनी एक पोस्ट करून यासंबधीची माहिती दिली. ट्रम्प यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की भारत व अमेरिका मित्र राष्ट्रे असूनही गेल्या काही वर्षांमध्ये उभय देशांमध्ये फारसे व्यावसायिक व्यवहार झालेले नाहीत.अमेरिकेचे अध्यक्ष म्हणाले, “भारत गेल्या अनेक वर्षांपासून बहुतेक लष्करी उपकरणं, शस्त्रं रशियाकडून खरेदी करत आला आहे. तसेच ऊर्जा खरेदीतही भारत चीनबरोबर रशियाचा सर्वात मोठा ग्राहक आहे.

# अर्चना पूरन सिंहचे आमिर खानबद्दल मोठे वक्तव्य

मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखला जाणारा अभिनेता म्हणजे आमिर खान. अनेकदा तो चर्चेत असतो. आता अर्चना पूरन सिंह यांनी त्याच्याविषयी केलेल्या वक्तव्यामुळे अभिनेत्याची चर्चा होताना दिसत आहे.अर्चना पूरन सिंहने नुकतीच ‘बॉलीवूड बबल’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत ‘राजा हिंदूस्तानी’ या चित्रपटातील ‘तेरे इश्क में नाचेंगे’ या गाण्याच्या शूटिंगवेळी आमिर खानने खरंच मद्यप्राशन केले होते का, असा प्रश्न विचारला होता. यावर उत्तर देताना अर्चना पूरन सिंहने म्हटले, “मी याबद्दल ऐकले आहे. आमचे जिथे शूटिंग सुरू होते, तिथे त्याची रूम माझ्या रूमच्या बाजूलाच होती. त्याने माझ्यासमोर कधीही मद्यप्राशन केले नाही, पण मला वाटते की त्याने त्या गाण्यासाठी मद्यप्राशनाचा प्रयोग केला असावा. पण, तो त्याच्या या प्रयोगाबद्दल खूश नव्हता.”‘राजा हिंदूस्तानी’ चित्रपटाबद्दल अर्चना पूरन सिंहने म्हटले, “हा चित्रपट माझ्यासाठी खास होता. कारण या चित्रपटातील माझ्या





भूमिकेसाठी मला फिल्मफेअर अवॉर्डमध्ये नॉमिनेशन मिळाले होते. या एकाच भूमिकेसाठी मला नॉमिनेशन मिळाले होते. नाहीतर मी कोणतेही पुरस्कार जिंकले नाहीत. जेव्हा परमित माझ्याजवळ आला आणि मला म्हणाला की, नॉमिनेशन हे देखील पुरस्कार जिंकल्यासारखे असते. त्यावेळी मला जाणीव झाली की मला पुरस्कार मिळणार नाही, पण तरीही पुरस्कार मिळाल्यासारखे वाटत होते.”अर्चना पूरन सिंह ‘द ग्रेट इंडियन कपिल शो’मध्ये दिसणार आहे. हा विनोदी कार्यक्रम १३ भागांचा असणार आहे. ‘द ग्रेट इंडियन कपिल शो’चा दुसरा सीझन २१ सप्टेंबरपासून प्रदर्शित होणार आहे. नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर हा शो पाहायला मिळणार आहे. दरम्यान, १९९६ साली प्रदर्शित झालेल्या ‘राजा हिंदूस्तानी’ या चित्रपटाने धुमाकूळ घातला होता. आजही या चित्रपटाचा मोठा चाहतावर्ग असल्याचे पाहायला मिळते. एका लहानशा खेड्यातील टॅक्सी ड्रायव्हर एका श्रीमंत मुलीच्या प्रेमात पडतो. त्यांच्यात असलेला फरक विसरून हे जोडपे कसे एकत्र येते, अशा आशयाची ही कथा आहे. या चित्रपटात आमिर खान, करिश्मा कपूर, अर्चना पूरन सिंह, जॉनी लिवर, मोहनीश बहल हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसले होते. अर्चना या चित्रपटात नकारात्मक भूमिकेत दिसली होती.

## “लॉरेन्स बिश्नोई को भेजूं क्या?”

बॉलिवूडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या कुटुंबाला बिश्नोई टोळीने पुन्हा एकदा धमकावण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी सलमानचे वडील, ज्येष्ठ पटकथा लेखक व अभिनेते सलीम खान यांना धमकी मिळाली आहे. सलीम खान घराजवळच्या उद्यानात बसलेले एक इसम व बुरखा परिधान केलेली महिला स्कूटरवरून त्यांच्या जवळ गेले. यावेळी महिलेने सलीम खान यांना लॉरेन्श बिश्नोई टोळीच्या नावाने धमकी दिली.सलीम खान हे नेहमीप्रमाणे बुधवारी (१८ सप्टेंबर) सकाळी देखील मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडले होते. या स्कूटरवर एक इसम व त्याच्या मागे एक बुरखा परिधान केलेली महिला बसली होती. या स्कूटरने यू टर्न घेतला आणि चालक ती स्टूकर घेऊन सलीम खान यांच्याजवळ गेला.

## जनाईच्या लूकनं वेधलं लक्ष



प्रसिद्ध गायिका आशा भोसले (ASHA BHOSLE) यांनी अनेक हिट चित्रपटांमधील गाणी गायली आहेत. अशा भोसले यांना 'मेलोडी क्वीन' असंही म्हटलं जातं. आशा भोसले या त्यांच्या गाण्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकतात. त्या अनेक कार्यक्रमांना देखील हजेरी लावतात. नुकत्याच आशा भोसले या त्यांच्या नातीसोबत एका कार्यक्रमामध्ये स्पॉट झाल्या. यावेळी अनेक पापाराझींनी त्यांचे फोटो काढले. आशा भोसले यांच्यासोबत त्यांची नात जनाई भोसले (ZANAI BHOSLE) हिचे देखील फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. जनाईच्या सौंदर्यानं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओमध्ये जनाई ही मोकळे केस, साडी आणि मोत्यांचे गळ्यातले अशा लूकमध्ये दिसत आहे. तर आशा भोसले या ऑफ व्हाइट कलरची साडी आणि मोत्यांची ज्वेलरी अशा लूकमध्ये दिसत आहेत. जनाई आणि आशा भोसले यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन जनाईच्या सौंदर्याचं कौतुक केलं आहे. जनाई ही आशा भोसले यांचा मुलगा आनंद भोसले यांची मुलगी आहे. जनाई ही तिच्या

## अरिजितने मन जिंकली

गायक अरिजित सिंह आपल्या आवाजाने चाहत्यांना मंत्रमुग्ध करतो. एखादा नवा सिनेमा यावा आणि त्यात अरिजितचे गाणे असावे, याची चाहते वाट बघतात. अनेक श्रोते अरिजितची जुनी हिट गाणी वेगवेगळ्या शैलीत ऐकण्यासाठी त्याच्या कॉन्सर्टला हजेरी लावतात. या कॉन्सर्टमध्ये अरिजित कधी जोडप्यांनी सांगितलेली गाणी गातो, तर आपल्या साध्या वागण्यातून, कृतीतून गातानाच चाहत्यांची मने जिंकतो. नुकत्याच एका कॉन्सर्टमध्ये अरिजितने एका चाहत्याने व्यासपीठावर ठेवलेले जेवण उचलून त्याच्या टीममधील व्यक्तीच्या हाती देत माफी मागितली. हा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, चाहते अरिजितचे कौतुक करत आहेत. अरिजित सिंह कॉन्सर्टच्या निमित्ताने वर्ल्ड टूर करत आहे. यात नुकताच त्याचा एक कॉन्सर्ट झाला. या कॉन्सर्टमध्ये अरिजित सिंहने ‘ऐ दिल है मुश्किल’ सिनेमाचे टायटल ट्रॅक गाताना त्याने केलेल्या कृतीने चाहत्यांची मने जिंकली.‘ऐ दिल है मुश्किल’ या गाण्यातील “मुझे आजमाती है तेरी जमीं” ही ओळ गात असताना, एक व्यक्ती त्याच्या जेवणाचा बॉक्स व्यासपीठावर अरिजितच्या पायाजवळ ठेवतो. ते पाहिल्यावर अरिजित ते जेवण उचलतो आणि तिथे असणाऱ्या त्याच्या टीममधील व्यक्तीकडे सुपूर्द करतो. यानंतर गाणं गातानाच अरिजित त्या चाहत्याची माफी मागतो. असा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर फिरतोय.

## ‘सर्व लोक आपला पाठलाग का करत आहेत?



अभिनेत्री करीना कपूर खानने तिच्या विविध भूमिकांमुळे चाहत्यांच्या मनावर छाप सोडली आहे. करीनाच्या उत्तम अभिनयामुळे ‘जब वी मेट’मधील ‘गीत’, ‘चमेली’, ‘कभी खुशी कभी गम’मधील ‘पू’(पूजा) या भूमिका चाहत्यांच्या नेहमी लक्षात राहिल्या आहेत. करीनाला बॉलीवूडमध्ये ट्रेंडसेटर म्हणूनसुद्धा ओळखले जाते. झिरो फिगर ते फॅशनमधील अनेक ट्रेंड तिने बॉलीवूडमध्ये आणले. करीनाला यावर्षी बॉलीवूडमध्ये २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. याच पार्श्वभूमीवर तिच्या विविधांगी भूमिका असलेले चित्रपट सिनेमागृहात दाखवले जाणार असून, तिच्याच नावाने चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.नुकतेच करीनाला तिच्याच सिनेमांच्या चित्रपट महोत्सवाच्या एका कार्यक्रमात “तुमच्या नावाने सिनेमहोत्सव सुरू होणार आहे, याची तैमूरला कल्पना आहे का?” हा प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना करीना म्हणाली की, तो अजून खूप लहान आहे, त्यामुळे त्याला याबाबत तशी कमी माहिती आणि समज आहे. जेव्हा पापाराझी आमच्या मागे येतात, त्यावरून त्याला थोडी कल्पना असेल.करीनाच्या नावाने सिनेमहोत्सव २० सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. या महोत्सवाच्या एका कार्यक्रमात करीना म्हणाली की, “तैमूर आणि मी जेव्हा एकत्र असतो, तेव्हा पापाराझी आमचा पाठलाग करतात. तेव्हा तैमूर म्हणतो, ‘सर्व लोक आपला पाठलाग का करत आहेत? मी लोकप्रिय आहे का?’ त्यावर करीना तैमूरला म्हणाली की, ‘तू नाही, मी लोकप्रिय आहे.

# अभिषेक शर्मा चमकला!

## सूर्यानंतर अशी कामगिरी करणारा ठरला तिसराच भारतीय

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून ( आयसीसी) बुधवारी टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांची क्रमवारी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत भारताचा युवा सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्माचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. अभिषेकने आपला सनरायझर्स हैदराबाद संघातील सहफलंदाज ट्रॅव्हिस हेडला मागे सोडत टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नंबर १ फलंदाज बनण्याची किमया साधली आहे. यासह तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अव्वल स्थान गाठणारा तिसराच भारतीय फलंदाज ठरला आहे. याआधी सूर्यकुमार यादव आणि विराट कोहली यांना हा पराक्रम करता आला आहे.**



ही क्रमवारी जाहीर करण्यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर फलंदाज ट्रॅव्हिस हेड अव्वल स्थानी होता. आता अभिषेक शर्माची टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील रेटींग ही ८२९ वर जाऊन पोहोचली आहे. तर ८१५ रेटींग पॉईंट्ससह ट्रॅव्हिस हेड दुसऱ्या स्थानी घसरला आहे. ८०४ रेटींग पॉईंट्ससह तिलक वर्मा तिसऱ्या स्थानी कायम आहे. काही महिन्यांपूर्वी अव्वल स्थानी असलेला भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव ७३९ रेटींग पॉईंट्ससह सहाव्या स्थानी कायम आहे. टी-२० क्रिकेटमधील १० अग्रगण्य खेळाडूंच्या यादीत ३ भारतीयांचा समावेश आहे. अभिषेक शर्माला ६ जुलै २०२४ मध्ये झिम्बाब्वेविरूद्ध झालेल्या टी-२० मालिकेत पदार्पण करण्याची संधी मिळाली होती. या मालिकेत त्याने दमदार शतकी खेळी केली होती. त्याला आपल्या टी-२० कारकिर्दीत आतापर्यंत १७ सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. यादरम्यान त्याने ३३.४३ च्या सरासरीने ५३५ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याच्या नावे २ शतकं आणि २ अर्धशतकं झळकावण्याची नोंद आहे. तर १३५ धावा ही त्याची सर्वोत्तम खेळी आहे. आपल्या आक्रमक फलंदाजीच्या बळावर त्याने भारतीय टी-२० संघात सलामीवीर फलंदाज म्हणून आपलं स्थान निर्माण केलं आहे.आयसीसीकडून कसोटी फलंदाजांची क्रमवारी देखील जाहीर करण्यात आली आहे. या यादीत भारताचा उपकर्णधार आणि यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतने सातव्या स्थानी झेप घेतली आहे. यासह तर सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वाल या यादीत आठव्या स्थानी घसरला आहे. दरम्यान इंग्लंडमध्ये दमदार फलंदाजी करत असलेला कर्णधार शुबमन गिल गुणतालिकेत ९ व्या स्थानी कायम आहे. तर अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत रवींद्र जडेजा अव्वल स्थानी कायम आहे.ही क्रमवारी जाहीर करण्यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर फलंदाज ट्रॅव्हिस हेड अव्वल स्थानी होता. आता अभिषेक शर्माची टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील रेटींग ही ८२९ वर जाऊन पोहोचली आहे. तर ८१५ रेटींग पॉईंट्ससह ट्रॅव्हिस हेड दुसऱ्या स्थानी घसरला आहे. ८०४ रेटींग पॉईंट्ससह तिलक वर्मा तिसऱ्या स्थानी कायम आहे. कर्णधार सूर्यकुमार यादव ७३९ रेटींग पॉईंट्ससह सहाव्या स्थानी कायम आहे.

### यादीत आठव्या स्थानी घसरला

टी-२० क्रिकेटमधील १० अग्रगण्य खेळाडूंच्या यादीत ३ भारतीयांचा समावेश आहे.अभिषेक शर्माला ६ जुलै २०२४ मध्ये झिम्बाब्वेविरूद्ध झालेल्या टी-२० मालिकेत पदार्पण करण्याची संधी मिळाली होती. या मालिकेत त्याने दमदार शतकी खेळी केली होती. त्याला आपल्या टी-२० कारकिर्दीत आतापर्यंत १७ सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. यादरम्यान त्याने ३३.४३ च्या सरासरीने ५३५ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याच्या नावे २ शतकं आणि २ अर्धशतकं झळकावण्याची नोंद आहे. तर १३५ धावा ही त्याची सर्वोत्तम खेळी आहे. आपल्या आक्रमक फलंदाजीच्या बळावर त्याने भारतीय टी-२० संघात सलामीवीर फलंदाज म्हणून आपलं स्थान निर्माण केलं आहे.आयसीसीकडून कसोटी फलंदाजांची क्रमवारी देखील जाहीर करण्यात आली आहे. या यादीत भारताचा उपकर्णधार आणि यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतने सातव्या स्थानी झेप घेतली आहे. यासह तर सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वाल या यादीत आठव्या स्थानी घसरला आहे.

# बेन स्टोक्स दुखापतग्रस्त!

## ओव्हल कसोटीला मुकणार, इंग्लंडला मोठा धक्का

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील निर्णायक सामना हा ३१ जुलैपासून ओव्हलच्या मैदानावर रंगणार आहे. इंग्लंडने आपली परंपरा कायम राखत सामन्याच्या एक दिवसआधीच अंतिम अकराची घोषणा केली आहे. ज्यात ४ मोठे बदल करण्यात आले आहेत. या संघातून कर्णधार बेन स्टोक्ससह जोफ्रा आर्चर,डॉसन आणि ब्रायडन कार्स यांना विश्रांती देण्यात आली आहे.**



मालिकेतील पाचवा सामना हा दोन्ही संघांसाठी अतिशय महत्वाचा असणार आहे. कारण इंग्लंडचा संघ या मालिकेत २-१ ने आघाडीवर आहे. त्यामुळे इंग्लंडने जर हा सामना जिंकला, तर इंग्लंडचा संघ ही मालिका ३-१ ने आपल्या नावावर करू शकतो. तर दूसरीकडे भारतीय संघाकडे ही मालिका २-२ ने बरोबरीत आणण्याची संधी असणार आहे. त्यामुळे भारतीय संघ देखील पूर्ण ताकदीने इंग्लंडचा सामना करताना दिसेल. मात्र, या सामन्याआधी इंग्लंडला मोठा धक्का बसला आहे.या संपूर्ण मालिकेत निर्णायक भूमिका बजावणाऱ्या बेन स्टोक्सने दमदार कामगिरी केली

### ओली पोपकडे कर्णधारपद

होती. त्याने गोलंदाजी करताना ५ गडी बाद केले होते. तर फलंदाजी करताना दमदार शतकी खेळी केली होती. मात्र, आता उजव्या खांद्याला दुखापत असल्यामुळे तो या निर्णायक सामन्यात खेळताना दिसून येणार नाही. त्याच्या जागी ओली पोपकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.या सामन्यात इंग्लंडला बेन स्टोक्सची कमतरता नक्कीच जाणवू शकते. यासह अंतिम अकरात आणखी ३ मोठे बदल करण्यात आले आहेत. लियाम डॉसन, जोफ्रा आर्चर आणि ब्रायडन कार्स यांना देखील या संघात स्थान देण्यात आलेलं नाही. त्यांना संघाबाहेर करण्याचं कारण देखील सांगण्यात आलेलं नाही. या चारही खेळाडूंच्या जागी गस एटकिंसन, जेकब बेथेल , जेमी ओव्हरटन आणि जोश टंग यांचा समावेश करण्यात आला आहे.जॅक क्रॉली, बेन डकेट, ओली पोप (कर्णधार), जो रूट, हॅरी ब्रुक, जेकब बेथेल, जेमी स्मिथ, ख्रिस वोक्स, गस एटकिंसन, जेमी ओव्हरटन, जोश टंग

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार ।
। दि. 31 जुलै 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# 'इन्सेप्टिया' म्हणजे व्यापक व्यासपीठ

## प्राचार्य डॉ. हरीश तिवारी : पीसीसीओइआर येथे राष्ट्रीय स्तरावरील इन्सेप्टिया हॅकेथॉन स्पर्धा संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'इन्सेप्टिया हॅकेथॉन २०२५' ही राष्ट्रीय स्पर्धा अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना नवीन संकल्पना, नव उपक्रम, तांत्रिक कौशल्य सादरीकरण यासाठी राष्ट्रीय स्तरावर व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देते.**




ही स्पर्धा फक्त जिंकण्यासाठी नसून राष्ट्राच्या तांत्रिक विकासात योगदान देण्यासाठी सहभाग घेण्याची एक संधी आहे असे पीसीसीओईआर चे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओइआर) येथे राष्ट्रीय स्तरावरील इन्सेप्टिया हॅकेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत सायलेंट ब्रिज टीमने प्रथम क्रमांकासह २५ हजार रुपयांचे बक्षीस मिळवले. या टीम मध्ये पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या नेहा जगताप, मानसी साबळे, मिताली दहिफळे आणि वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी रितेश चौधरी यांचा समावेश होता. वाघोली येथील जी. एच. रायसोनी कॉलेजच्या टीम डीएमएस ने द्वितीय क्रमांक मिळवून १५ हजार रुपयांचे बक्षीस आणि पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या टीम लोकलहोस्ट ने तृतीय क्रमांक मिळवून १० हजार रुपयांचे बक्षीस मिळवले.

यावेळी उपसंचालक डॉ. राहुल मापारी, विद्यार्थी कल्याण विभाग अधिष्ठाता डॉ. महेंद्र साळुंखे, संगणक विभाग प्रमुख डॉ. विजय कोटकर, आयटी विभाग प्रमुख संतोषकुमार चौबे, विद्यार्थी संघटनाप्रमुख अथर्व सातपुते उपस्थित होते.

डॉ. तिवारी यांनी सांगितले की, पीसीईटी नेहमीच उच्च तंत्रज्ञान, कला आणि शैक्षणिक मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी प्रयत्नशील असते. या स्पर्धेत आरोग्य सेवा, शिक्षण, वेब ३, फिनटेक, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, ओपन इनोव्हेशन या विषयाशी संबंधित सर्जनशील आणि तांत्रिक कौशल्य प्राप्त असणारे प्रकल्प सादर करण्यात आले.

समन्वयक म्हणून करण मालोरे, अथर्व सातपुते, आदित्य वाघमारे, राजस नांदेडकर, सृष्टी पाटील, मानसी चित्राल, श्रीराज डोंगरे या विद्यार्थ्यांनी काम पाहिले. प्रास्ताविक डॉ. संतोषकुमार चौबे, आभार प्रा. भावना भदाणे यांनी मानले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# एमआयटी महाविद्यालयाची टाइम्स बीबीए रँकिंगमध्ये उज्वल कामगिरी

## देशभरातील टॉप 50 खाजगी बीबीए संस्थांमध्ये 34 वे स्थान; पुण्यात दुसरा क्रमांक

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी यांनी “टाइम्स बीबीए एज्युकेशन रँकिंग सर्व्हे २०२५” मध्ये भरीव यश संपादन करत देशभरातील आणि प्रादेशिक बीबीए शिक्षण संस्थांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.**





या राष्ट्रीय रँकिंगमध्ये एमआयटी महाविद्यालयाने खालीलप्रमाणे उल्लेखनीय स्थान मिळवले: देशातील टॉप ७० बीबीए महाविद्यालयांमध्ये ४९ वा क्रमांक, खाजगी बीबीए संस्थांमध्ये देशात ३४ वे स्थान, पश्चिम विभागात ७ वा क्रमांक, पुणे शहरात दुसरा सर्वोत्तम बीबीए महाविद्यालय म्हणून गौरव अशी कामगिरी केली आहे.

### शिक्षक, विद्यार्थी आणि नेतृत्व यांचा एकत्रित यशाचा परिणाम

### बीबीए शिक्षणात गुणवत्ता आणि कौशल्यांचे अधिष्ठान

ही रँकिंग एमआयटी महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण बीबीए शिक्षण, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष आणि उद्योगजगतातील गरजांनुसार तयार केलेल्या अभ्यासक्रमांचे प्रतिबिंब आहे. एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज व्यवसाय शिक्षणात आपले स्थान अजून अधिक बळकट करत आहे, आणि येणाऱ्या काळात आणखी प्रगती साधण्याच्या दिशेने पावले टाकत आहे.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले, “ही मान्यता आमच्या समर्पित प्राध्यापक, कर्मचारी आणि प्रतिभावान विद्यार्थ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ आहे. जागतिक दर्जाचे व्यवसाय शिक्षण देण्याच्या आमच्या कटिबद्धतेची ही पावती आहे.” यशाच्या या पर्वावर उपसंचालक डॉ. मानसी Aमाने, विभागप्रमुख प्रा. आकांक्षा लांडगे, तसेच प्रा. अक्षदा कुलकर्णी यांनी देखील समाधान व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांच्या यशामध्ये महाविद्यालयाच्या योगदानाची प्रशंसा केली.

# विद्या व्हॅली नॉर्थ पॉईंट स्कूलसाठी अभिमानाचा क्षण!

## शिक्षण विश्व: ग्रेड 5 चा विद्यार्थी अन्वय नाईकुडे याने दिल्लीत झालेल्या आंतरशाळा वॉल क्लायम्बिंग स्पर्धेत पटकावले कांस्य पदक!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड : विद्या व्हॅली नॉर्थ पॉईंट स्कूलसाठी एक अत्यंत आनंदाचा आणि गौरवाचा क्षण आहे! शाळेचा पाचवीतील विद्यार्थी अन्वय नाईकुडे याने २८ जुलै २०२५ रोजी दिल्लीत पार पडलेल्या आंतरशाळा वॉल क्लायम्बिंग स्पर्धेत आपले उत्कृष्ट कौशल्य, धैर्य आणि जिद्द दाखवत कांस्य पदक (तृतीय क्रमांक) पटकावला आहे.**







ही स्पर्धा UNDER-10 (१० वर्षाखालील) वयोगटासाठी आयोजित करण्यात आली होती. देशभरातील विविध शाळांमधून आलेल्या स्पर्धकांमध्ये अन्वयने आपल्या दमदार कामगिरीने वेगळी छाप पाडली. त्याची चपळता, समतोल आणि चिकाटी यामुळे तो या स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला.

शाळेच्या सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि विद्यार्थी वर्गाच्या वतीने अन्वयचे अभिनंदन करण्यात आले. “अन्वयचा हा यशस्वी प्रवास केवळ त्याच्या मेहनतीचा नव्हे, तर आमच्या शाळेच्या खेळ व सहशालेय उपक्रमांवरील भराचाही पुरावा आहे,” असे मत शाळेच्या प्रतिनिधींनी व्यक्त केले. विद्या व्हॅली नॉर्थ पॉईंट स्कूलचा अभिमान – अभिनंदन अन्वय! तुझ्या या उत्तुंग यशाबद्दल संपूर्ण शाळा तुझ्यावर गर्व करते. भविष्यात तू आणखी उंच भरारी घेशील, अशी आम्हाला खात्री आहे! अन्वय नाईकुडे – तू आमच्या शाळेचा प्रकाशझोत आहेस! अशा शब्दांत शाळेच्या शिक्षकांनी नाईकुडे याचे कौतुक केले आहे.

EDUCATING **MIND & HEART**


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

## ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

**55+** NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

**11+** CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

**17k+** 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

**600+** TEACHING AND NON TEACHING STAFF

**13k+** 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS

BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826

alandi@priyadarshanischools.org

www.priyadarshanischools.org